नियमीत फौजदारी खटला क्र. **५०/२०२१**
निशाणी क्र. **११५/क**

**<u>कलम २४४(१) फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये दोषारोपापूर्वीचा पुरावा</u>**
**(दृक–श्राव्य प्रणालीद्वारे)**

**फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

माझे संपूर्ण नांव : **शारदा शरद पोवार**
वय सुमारे : ४८ वर्षे, व्यवसाय : नोकरी
निवासस्थान : ऐरोली, नवी मुंबई

**<u>सरतपासणी फिर्यादी पक्षातर्फे वकील कुमारी कविता परीट यांचेमार्फत</u>** :

दि. ०७/०४/२०२१ रोजी मी अलिबाग येथे उपविभागीय अधिकारी म्हणून कार्यरत होते. मधुकर शंकर ठाकूर यांनी तक्रारी अर्ज दिला होता. सदर अर्ज चौकशीकरीता तहसिलदार, अलिबाग यांच्याकडे पाठविला. मंडळ अधिकारी व तलाठी यांनी जागेवर जावून पंचनामा केला. रेवदंडा येथील सर्व्हे क्र. १२२/१अ या जमिनीसदंर्भात तक्रार होती. सहाय्यक संचालक नगररचनाकार यांच्याकडून अभिप्राय मागितला होता. आर.एफ्.ओ. कडून अहवाल व सॅटेलाईट नकाशे घेतले होते. एकूण २३ जणांविरुद्ध तक्रारी अर्ज दिला होता. आर.एफ्.ओ. यांनी अहवाल दिला होता की, सदर जागा सी.आर.झेड्. व कांदळवन सदृश्य आहे.

०२. तक्रारीसोबत मंडळ अधिकारी यांचा पंचनामा, तहसिलदार यांचा अहवाल, आर.एफ्.ओ. यांचा अहवाल व गुगल नकाशे दाखल केलेले आहेत.

**तांत्रिक कारणामुळे उर्वरीत सरतपास तहकूब करण्यात आला**.

समक्ष

अलिबाग.
दिनांक : **२७/०६/२०२३**.

( **शै. वा. उगले** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

**<u>पुढील सरतपास सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. प्रसाद एस्. पाटील यांचेमार्फत शपथेवर सुरु (दृक–श्राव्य प्रणालीद्वारे)</u> :**

०३. कांदळवन होते हे सकृतदर्शनी दिसून आले. त्या सरकारी जागेवर आरोपींनी अनधिकृतपणे बंगले बांधलेले आहेत. कांदळवन तोडल्याबाबत पर्यावरण संरक्षण कायद्यांतर्गत फिर्याद दिलेली आहे. फिर्याद निशाणी क्र. १ मधील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. गुगल मॅप, वनक्षेत्रपाल यांच्या अहवालावरुन मी आरोपींविरुद्ध तक्रार दाखल केलेली आहे.

**सरतपास पूर्ण**.

**<u>आरोपींतर्फे उलटतपास दोषारोप निश्चित होईपर्यंत तहकूब करण्यात आला.</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **२३/०९/२०२५.** मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.